# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

## महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3 रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400 614.

-: **<u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u>** :- दिनांक 12/02/2016.

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>फेब्रुवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, शनिवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

1. प्रश्नोत्तरे.
2. महिला व बालकल्याण समितीचा दिनांक 21/01/2016 रोजीचा ठराव क्र. 12.
3. समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समितीचा दिनांक 29/01/2016 रोजीचा ठराव क्र. 16
4. विद्यार्थी व युवक कल्याण समितीचा दिनांक 04/02/2016 रोजीचा ठराव क्र. 03
5. बेलापूर विभागातील से. 19/20 मधील टोटल कार मॉल ते पंपहाऊस पर्यंत रस्त्याची सुधारणा करणे.
6. बेलापूर विभागातील से. 36 करावे येथील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करणे.

**7 ते 9. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**

**(7)** प्र. क्र. 55 मध्ये से. 11 ला लागून नाला आहे रिलायन्स फ्रेश मॉल जवळील पूलापासुन ते रेल्वे लाईन पर्यंतच्या नाल्याच्या बाजूने रस्ता बनविलेला आहे. त्यास लागून नाल्याच्या बाजूने सुरक्षेच्या दृष्टीने फेन्सींग उभारणे. **(8)** प्र. क्र. 55 से. 11 रिलायन्स फ्रेशच्या मागील बाजूस जाणाऱ्या बाजूने जॉगींग ट्रॅक बनविलेला आहे. त्याचे नुतनीकरण करणे. तसेच ट्रॅकच्या बाजूने स्लॅटींगच्या उताराजवळ असलेल्या फुटपाथवरील लिकर कोटींगचे पेवर ब्लॉक बसविणे**(9)** प्र. क्र.55 खैरणेगांव येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविणे.

**10 व 11. सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**

**(10)** प्र. क्र. 83, जुईनगर, अंतर्गत स्मशानभुमीच्या बाहेर आग्नेय कोपऱ्यावर असलेल्या हरितपट्टयाचे लवकरात लवकर सुशोभिकरण करुन लोकांना एक छोटेसे उद्यान उपलब्ध करणे. **(11)** प्र. क्र.83, जुईनगर येथील शाळा क्र. 17 येथील संगणकीय ठेका संपला असुन सदर शाळेत संगणकीय शिक्षण बंदच झालेले आहे तरी तेथे ताबडतोब संगणकीय ठेकेदार नेमुन विदयार्थ्यांचे होणारे नुकसान टाळणे.

**12 व 13.श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**

**(12)** प्र. क्र.84 मध्ये सेक्टर 2 व 4 मध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे.**(13)**प्र. क्र.84 मध्ये सेक्टर 2 वारणा कॉलनी ते आम्रपाली सोसायटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.

**14 ते 16.श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून:-**

**(14)** प्र. क्र.82 मध्ये जुईनगर स्टेशनपासुन ते पाण्याच्या टाकीपर्यंत असलेले पदपथ दुरुस्ती करणे.

**(15)** प्र. क्र. 82 मधील गणेश मैदानाचे सुशोभिकरण करण्यात यावे असे या सभेचे मत आहे. **(16)** प्र. क्र.82 मध्ये अपोलो सोसायटी ते आनंदवन सोसायटी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

**17 ते 19.श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-**

**(17)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये पाण्याची कपात असल्याने नागरीक विहिरींच्या पाण्याचा वापर करीत आहेत. तरी महापालिका क्षेत्रातील सर्व विहिरी स्वच्छ करुन पाण्याची तपासणी करुन वापरण्यास योग्य की अयोग्य ते फलक लावावे व परिसर सुशोभिकरण करणे. **(18)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील तलावामध्ये दरवर्षी गणेशमुर्ती/ देवीमुर्ती विसर्जन होऊन पाणी अस्वच्छ झाले आहे. अनेक वर्ष तलावातील गाळ काढला नाही. तरी महापालिका क्षेत्रातील सर्व तलावांचे गाळ काढणे.**(19)** "शिरवणे प्र. क्र.81 मध्ये सिडकोने गांवठाण विस्तार योजना राबवून भुखंड वितरीत केले आहेत. सदर भुखंडावर इमारती बांधून रहिवाशी वास्तव्या करीता आले आहेत. महापालिकेच्या वतीने प्रत्येक रस्त्यास नांव दिले आहे. परंतू रस्त्याच्या नामकरण फलक तुटलेले आहेत. तरी सदर नाम फलक नव्याने डिझाईन करुन फलकावर भुखंड दिशा दर्शक फलक लावणे.

**20 ते 22. श्री. देवीदास अनंतराव हांडेपाटील, यांजकडून :-**

**(20)** प्र. क्र.42, मधील सेक्टर 16 मधील भुखंड क्र. 38 हा डिस्पेन्सरी साठी राखीव म्हणून महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेला आहे. परंतू अगदी जवळच महापालिकेचे माता बाल रुग्णालय अस्तित्वात आहे. म्हणून भुखंड क्र. 38 चे आरक्षण बदलून तेथे बहुउद्देशीय इमारत बांधणे. **(21)** प्र. क्र.42 कोपरखैरणे, सेक्टर 23 येथील भुखंड क्र. 20 ए हा भुखंड सिडकोकडून महानगरपालिकेला शाळेसाठी हस्तांतरीत झालेला आहे. त्या भुखंडावर महानगरपालिकेच्या शाळेसाठी इमारत बांधणे. **(22)** प्र. क्र.42, कोपरखैरणे सेक्टर 23 येथे श्री गणेश पंचम सौजन्य व श्री. लक्ष्मी या 18:00 चौ.मि. च्या अल्प उत्पन्न गटातील वसाहती मध्ये अंतर्गत पाण्याच्या लाईन बदलणे.

**23 ते 25. सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**

**(23)** प्र. क्र.33 मध्ये सिडकोने विकसित केलेल्या घणसोली सेक्टर 2 या क्षेत्रातील श्री मुक्कांबिका मंदिराच्या बाजूस बैठया स्वरुपात असलेली नागरी वसाहत हागणदारी मुक्त करण्यासाठी

महानगरपालिकेच्या माध्यमातून या वसाहतीमध्ये योग्य संख्येच्या शौचालयाची उभारणी करणे. **(24)** प्र. क्र.33 मध्ये घणसोली विभागातील सेक्टर 5 येथील दगडी बांधकामाच्या गटारांची व त्यावरील पदपथांची दुरावस्था झाल्याने नागरीकांच्या जिवितास धोका उत्पन्न होणारी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे या गटारांची व पदपथांची योग्य पध्दतीने पुर्नबांधणी करणे. **(25)** प्र. क्र.33 घणसोली सेक्टर 4 मध्ये सिडकोच्या शहर नियोजन आराखडयानुसार बाजार मंडई फेरीवाला क्षेत्र म्हणून आरक्षित असलेला भुखंड क्रमांक 215 व त्या लगतची मोकळी जागा सिडकोकडून अधिग्रहीत करुन त्या ठिकाणी बाजार मंडईची उभारणी करण्यात यावी.

**26 ते 28. सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(26)** प्र. क्र.01, इश्वरनगर येथे सिध्दीविनायक मंदिर, ईश्वरनगर ते वाशी रेल्वे स्थानक (महापे मार्गे) नवी मुंबई महानगरपालिकेची बससेवा सुरु करणे. **(27)** प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागात कचरा कुंडीची संख्या अपुरी असल्याने सदर ठिकाणी नवीन कचरा कुंडी देणे. **(28)** प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथे मन्नुभाई चाळ व तुळजा भवानी चाळीच्या मागील गटाराची अत्यंत दुरावस्था झाली असुन सदर ठिकाणी नवीन गटार बांधणे.

**29 ते 31. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**

**(29)** प्र. क्र. 26, महापे मधील अडवली-भुतावली गांव व महापे गाव येथील श्री.विलास पाटील यांच्या घरापासून ते श्री. यशवंत पाटील यांच्या घरापर्यंत, श्री. अमृत पाटील यांच्या घरापासुन ते श्री. सुखदेव जेपाल यांच्या घरापर्यंत, श्री. बाबु डाऊरकर यांच्या घरापासुन ते सार्वजनिक शौचालय पर्यंत श्री. ढवळे चाळ ते श्री. सोनावणे यांच्या घरापर्यंत जुनी व उघडी गटारे दुरुस्त करुन बंदिस्त करण्यात यावीत तसेच संभाजी नगर येथील श्री. तरे यांच्या घरापासून ते श्री. हाडळ यांच्या घरापर्यंत नवीन गटार बांधुन ते बंदिस्त करणे. **(30)** प्र. क्र.26, महापे येथील हनुमान नगर, संभाजीनगर व अडवली-भुतावली गाव येथे सार्वजनिक मुतारी बांधणे. **(31)** प्र. क्र.26, अडवली-भुतावली गावतील सार्वजनिक शौचालयाला मलनि:स्सारण वाहिनी जोडली नसल्याने शौचालया बाहेर घाण पाणी तिथेच साचुन दुर्गंधी पसरते. त्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी अडवली-भुतावली गावातील सार्वजनिक शौचालयांना मलनि:स्सारण वाहिनी जोडणे.

**32 ते 34. सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**

**(32)** प्र. क्र.103 मध्ये सिडकोने शहर नियोजन आराखडयानुसार सिबीडी बेलापूर येथील सेक्टर 8 बी मधील भुखंड क्र. 28 बी हा आरोग्य सेवा सुविधांसाठी आरक्षित असल्याने सदरचा भुखंड मनपाने सिडकोकडून रितसर ताब्यात घेऊन अथवा नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारात अधिग्रहीत करुन त्या ठिकाणी सर्व सेवा सुविधायुक्त अशा रुग्णालयाची उभारणी करणे. **(33)** प्र. क्र.103 मध्ये सिडकोने शहर नियोजन आराखडयानुसार सिबीडी बेलापूर येथील सेक्टर 8 व सेक्टर 8 बी मध्ये दैनंदीन बाजार मंडई या सुविधेकरीता आरक्षित असलेले भूखंड मनपाने सिडकोकडून रितसर ताब्यात घेऊन अथवा नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारात अधिग्रहीत करुन त्या दोन्ही ठिकाणी सर्व सेवा सुविधायुक्त सार्वजनिक बाजार मंडई बांधणे.**(34)** प्र. क्र.103 मधील सेक्टर 8 बी या क्षेत्राच्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या दुर्गामाता नगर या 250 घरांच्या नागरी वसाहतीमध्ये जाण्यासाठी रस्ता नसल्याने त्या ठिकाणी राहणाऱ्या आबाल वृध्दांना, विशेषत: महिला वर्गास दैनंदीन कामासाठी त्याचप्रमाणे आजारी रुग्णांना औषध उपचारासाठी पायी तसेच वाहनाने मार्गक्रमण करण्यास अनेक अडचणी व समस्या उद्‌भवतात म्हणून दुर्गा माता नगराकडे जाण्यासाठी रस्त्याची उभारणी करणे.

**35 ते 37. सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**

**(35)**प्र. क्र.48, पावणेगांव येथील सांडपाणी वाहुन नेणारी गटारे बांधणे. **(36)** प्र. क्र.48, श्रमिकनगर प्राथमिक शाळेमध्ये इंग्रजी माध्यम सेमी इंग्रजी माध्यम बालवाडी सुरु करणे. **(37)** प्र. क्र.48, पावणेगांव येथे वाहनांसाठी वाहन तळ बनविणे.

**38 श्री. गणेश गं. म्हात्रे, यांजकडून :-**

प्र. क्र.111, मधील सेक्टर 46अे प्लॉट नं. 6 एकुण क्षेत्रफळ 5000 चौ.मी. हे नवी मुंबई महानगरपालिकेचे मैदान असून ते खेळण्यासाठी पूरेसे नाही. लहान मैदान असल्यामुळे बऱ्याचदा क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंनी चेंडू टोलवला असता चेंडू शेजारील इमारतीच्या घरांच्या खिडक्यांना लागून त्या ठिकाणी खिडकीच्या काचा तूटणे तसेच शेजारी उभ्या असलेल्या वाहनांच्या काचेला लागून वाहनांची देखील काच तुटलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी नेहमी वाद होण्याचे प्रकार घडतात. सिवूड-नेरुळ परिसरात एक ही तरणतलाव नाही त्यामुळे या ठिकाणच्या नागरीकांची गैरसोय होत आहे. परंतू सदर मैदानात महानगरपालिकेने तरण तलावाची निर्मिती केल्यास नेरुळ सिवूड तसेच बेलापूर विभागातील नागरीकांना त्याचा लाभ घेता येईल तरी कृपया सदर मैदानात तरण तलाव तयार करणे.

**39 ते 41. श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-**

**(39)** प्र. क्र.102, सी.बी.डी. सेक्टर 9 एन येथील संरक्षण भिंतीची उंची वाढविणे. **(40)** प्र. क्र.102, सी.बी.डी. सेक्टर 9 येथील पिपल्स शाळेच्या मागील बाजूस संरक्षण भिंतीची दुरुस्ती करणे. **(41)** प्र. क्र.102, सुनिल गावस्कर मैदान येथील असलेल्या झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधून व मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

**42 ते 44. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(42)** प्र. क्र.101 मधील पारसिक हिल येथील रहिवाश्यांच्या सोयीसाठी प्रत्येक बंगलोकडे जाणाऱ्या रस्त्याला दिशादर्शक नामफलक उभारणे.**(43)** प्र. क्र.101 मधील आयकर कॉलनी येथील सांदिपनी को.ऑ.हौ.सो.समोरील डोंगराच्या पायऱ्यांपासुन ते डी टाईप येथील पोलीस बीट मार्शल चौकीपर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला असलेली नादुरुस्त संरक्षण भिंत नव्याने बांधणे. **(44)** प्र. क्र. 101 मधील आग्रोळी गांव मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(60)**

येथील गजानन पाटील यांच्या घरापासून ते महेंद्र वास्कर यांच्या घरापर्यंत व विजय म्हात्रे यांचे घर ते शंकराच्या मंदिरापर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या नादुरुस्त गटारावर हेवी डयूटी स्लॅप टाकून नव्याने गटारे बांधणे.

**45 ते 47. सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**

**(45)** प्र. क्र.2, रामनगर येथील ओवर हेड Electric Wire भुमिगत करणे.**(46)** प्र. क्र.2, ईश्वरनगर येथे बालाजी नगर मध्ये समाजमंदिर बांधणे. **(47)** प्र. क्र.2, ईश्वरनगर येथे सेवरेज लाईन टाकणे.

**48 ते 50. श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**

**(48)** प्र. क्र. 5, कन्हैयानगर येथे 5 लाख लिटरची पाण्याची टाकी बांधणे. **(49)** प्र. क्र. 5, सुभानगर येथे शाळेच्या वर्ग खोल्या बांधणे. **(50)** ठाणे बेलापूर रोडवर मुकुंद कंपनी जवळ नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी नविन स्काय वॉक बांधणे.

**51 व 52. सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**

**(51)** प्र. क्र.35, घणसोली विभागाच्या नागरी वसाहत क्षेत्राला लागुन वाहणाऱ्या मोठया नाल्याची पुर्नबांधणी करुन त्या नाल्यालगत संरक्षक भिंत उभारणे. **(52)** प्र. क्र.35,घणसोली प्रभागामध्ये शहर नियोजन आराखडयानुसार आरक्षित असलेल्या भुखंडावर सार्वजनिक आरोग्यलयाची उभारणी करणे.

**53 सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-**

प्र. क्र.56, मध्ये जेष्ठ नागरिकांच्या करमणुकीकरीता कोणतेही साधन नाही त्यामुळे त्यांची फार मोठी गैरसोय होत आहे. संध्याकाळी जेव्हा जेष्ठ नागरिक घराबाहेर पडतात तेव्हा त्यांना बसण्यासाठी कुठेही हक्काची जागा नाही. म्हणून प्र. क्र.56, मध्ये जेष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र बांधणे.

**54. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिकेमधील कोणत्याही कर्मचारी भरतीमध्ये पालिकेतील सुशिक्षित सफाई कामगार व त्यांच्या सुशिक्षित मुलांना प्रथम प्राधान्य देणे.

**55 ते 57. श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-**

**(55)** प्र. क्र. 38 कोपरखैरणे मध्ये महापे ब्रीज ते राजधानी स्विट पर्यंत फुटपाथला सेफ्टी ग्रील लावणे. **(56)** प्र. क्र. 38 कोपरखैरणे मध्ये वरिष्ठा हॉटेलच्या मागील फुटपाथ व त्याच रोडवर शाळा क्र. 38 वरील रोडला सेफ्टी ग्रील लावणे. **(57)** प्र. क्र. 38 मध्ये पंचवटी हॉटेलच्या बाजूला असलेल्या रिक्षा स्टँड वरील अतिक्रमण हटवून त्याचे सुशोभिकरण करणे.

**58 ते 60. सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(58)** प्र. क्र. 96 सेक्टर 16 मध्ये एकही सुलभ शौचालय किंवा मुतारी नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी सर्वेक्षण करुन आवश्यक तिथे सुलभ शौचालय किंवा ई टॉयलेट ची सुविधा उपलब्ध करणे. **(59)** प्र. क्र. 96 सेक्टर-16 ए व सेक्टर 14 मधील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना आणि नागरिकांना त्रास होत आहे. सदर रस्त्याचे गेली 10 वर्षे डागडुजी ही करण्यात आलेली नाही. तरी नेरुळ सेक्टर-16 ए व सेक्टर 14 प्र. क्र. 96 सेक्टर-16 येथील सी ब्रिज टॉवर लगत असलेल्या मोठया गटारावर झाकणे नाहीत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे व परत त्या गटारात माती व घनकचरा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्या गटारांवर झाकणे बसविणे.

**61 व 62. श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**

**(61)** सार्वजनिक प्राधिकरणांना अपारंपारिक स्त्रोत माध्यमाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून योजना प्रकल्पांच्या संदर्भाने अनुदान, मदत इ. स्वरुपाने तरतुद केलेल्या निधीतुन ठाणे बेलापूर व पाम बीच मार्गावर सौर उर्जेचा वापर करुन एल. ई. डी. पथ दिव्यांची उभारणी करणे. **(62)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ मुलुंड ऐरोली येथील दिवा सर्कल येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारणे.

**63 ते 65. सौ. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-**

**(63)** प्र. क्र. 88, प्लॉट नं. 1, सेक्टर 29 मध्ये 600 मीटर भुखंड पार्किंगसाठी रिकामा ठेवला आहे त्या भुखंडाला सब डिव्हीजन करुन 500 मीटर मध्ये बहुउद्देशीय इमारत बांधणे. **(64)** प्र. क्र. 88, सेक्टर 3 ते 11 येथे बस डेपो ते सेंट ऑगस्टीन शाळेपर्यंत नागरिक व विदयार्थी मोठया प्रमाणात ये जा करीत असतात सदर रस्त्यावर वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असल्याने सदर ठिकाणी लवकरात लवकर स्कायवॉक बांधणे. **(65)** प्र. क्र. 88, प्लॉट नं. 10, सेक्टर 29 मधिल वाहन पार्किंग लगत स्वच्छता अभियान अंतर्गत महिला व पुरुषासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे.

**66. सौ. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

नवी मुंबई महापालिकेकडून केंद्र व राज्य शासनाने तरतूद केलेल्या निधीच्या माध्यमातून दारीद्र रेषेखालील तसेच अनुसुचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक, अपंग, महिला या घटकांतील युवक युवतींसाठी विविध अभ्यासक्रमांचे कौशल्य प्रशिक्षण मोफत देण्यात येते. त्याचप्रकारचे कौशल्य प्रशिक्षण हे नवी मुंबई शहरातील प्रकल्पबाधीत तसेच इतर मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील घटकांना विशेष बाब म्हणून महापालिकेच्या माध्यमातून मोफत अथवा नाममात्र शुल्क आकारणीने प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे.

**67 ते 69. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**

**(67)** प्र. क्र.108, अंतर्गत सिवुड सेक्टर-48 मधील सर्व बस थांबाची डागडुजी करणे. **(68)** प्र. क्र.108, अंतर्गत सेक्टर-48 मधील उदयानाचे नुतनिकरण व सुशोभिकरण करणे. **(69)** प्र. क्र. 108, अंतर्गत सेक्टर-48 मधील शाळेच्या भुखंडावरील शाळेच्या इमारतीचे काम सुरु आहे. तरी सदर ठिकाणी इंग्रजी माध्यम सोबत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे.

**70 ते 72. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**

**(70)** प्र. क्र. 95, मध्ये "डी" ब्लॉक येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(71)** प्र. क्र. 95, येथे उच्च दाबाचे दिवे बसविणे. **(72)** प्र. क्र. 95, रामलिला मैदान राहत असुन प्रभागात विद्युत पुरवठयाचा अभाव असल्याने सायंकाळच्या व रात्रीच्या वेळी प्रकाशा अभावी नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तसेच मौल्यवान

पासून ते नेरुळ तलाव येथील रस्त्यावर डेकोरेटिव्ह पोल बसविणे.

**73 व 74. श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून:-**

**(73)** प्र. क्र. 53, येथील निलसिध्दी टावर ते वाशी हद्द पर्यंत गटाराची व फुटपाथची सुधारण करणे बाबत सदर गटर व फुटपाथची सुधारणा आत्तापर्यंत कधीच करण्यात आली नाही तरी सदर गटर व फुटपाथची सुधारणा करणे. **(74)** प्र. क्र. 53, येथील होल्डींग पाँडचा रस्ता त्याचा लोक जॉगिंग ट्रॅक म्हणून वापर करतात पण त्या रोडला जास्त उंचखाल खड्डे असल्यामुळे लोकांना चालायला त्रास होतो अशी तक्रार से. 12 चे रहिवाशी व जुहुगांव से. 11 चे रहिवाशी करतात तरी त्याच डांबरीकरण करणे.

**75 ते 77. श्री. संजू  धार वाडे, यांजकडून :-**

**(75)** प्र. क्र.12, सेक्टर 2 मधील ए.बी.सी.डी. ई. हे जे ग्रुप आहेत ते एल. आय. जी. ची घरे आहेत. त्यांचे ड्रेनेज सिस्टिम ही सिडको कालीन असल्यामुळे ती ड्रेनेज सिस्टिम बदलणे गरजेचे आहे. त्यामुळे ही ड्रेनेज सिस्टिम बदलून देणे. **(76)** प्र. क्र. 12, सेक्टर 2 मधील सिडकोच्या राहत्या घरांच्या मधील बाजूस जे मोकळे भुखंड आहे त्या ठिकाणी अतिशय घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तरी त्या आठ भुखंडावरील मोकळया बाजूस ब्लॉक लावून महीला, लहान मुले व जेष्ठ नागरीकांना बसण्यासाठी बँचेस लावून देणे. **(77)** प्र. क्र. 12, सेक्टर 2 मधील जे ए.बी.सी.डी. ई. एल. आय. जी. ग्रुपची घरे आहेत. त्या ठिकाणी चौकांमध्ये नागरीकांसाठी बैठक व्यवस्था म्हणून बँचेस उपलब्ध करुन देणे.

**78 ते 80. सौ. संगीता अशोक पाटील, :-**

**(78)** नवी मुंबई ऐरोली मुलुंड ब्रीजजवळ नवी मुंबईचे प्रवेशद्वार लवकरात लवकर उभारणे. **(79)** प्र. क्र.15, सेक्टर 16 मध्ये दिवाबत्तीची सोय व्यवस्थित नाही. तरी चौकांमध्ये हायमास्ट बसविणे. **(80)** प्र. क्र.15, सेक्टर 12, 13, 14, व 15 चा उघडा असलेला नाला बंदिस्त करणे.

**81 ते 83. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**

**(81)** प्र. क्र.97, मध्ये सेक्टर 18 मध्ये पामबीच येथील सर्व्हीस रोडला जी मधोमध 3 झाडे आहेत त्यांच्या दोन्ही बाजूला रिफलेक्टर लावणे. **(82)** प्र. क्र.97, मध्ये सेक्टर-20 मध्ये बालाजी मंदिरामागून नेरुळ स्टेशनला जाणाऱ्या पायऱ्यांवर येणाऱ्या सांडपाण्याची विल्हेवाट व दिवाबत्तीची व्यवस्था करणे. **(83)** प्र. क्र. 97, मध्ये सेक्टर-20 कडे आणि 24 कडे जाणाऱ्या रस्त्याच्या चौकात अपुरा प्रकाश असल्यामुळे त्या ठिकाणी गैरप्रकार घडले आहेत. तरी त्या ठिकाणी हायमास्टचे दिवे लावणे.

**84 ते 86. श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**

**(84)** प्र. क्र.89, मध्ये जेष्ठ नागरीक, मध्यम वर्गीय नागरीक व लहान मुलांना वाचनाकरीता एकही वाचनालय सदर विभागात नसल्याने नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी प्र. क्र.89 च्या मुख्य ठिकाणी वाचनालय उभारणे. **(85)** प्र. क्र. 89, शिरवणे गांवामध्ये प्रकल्पग्रस्त व इतर नागरीक मोठया प्रमाणात दागदागिने, मोटार सायकल व चारचाकी वाहने व इतर महागडया वस्तु चोरीच्या घटनेमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने प्रभागात मुख्य चौक व रहदारीच्या ठिकाणी हायमास्ट दिवे लावणे. **(86)** प्र. क्र.89, शिरवणे गांवामध्ये विविध प्लॉट क्र. आणि सोसायटी आहेत तसेच शिरवणे गांवठाणचा विस्तार मोठा असल्याने चाकरमानी व नवीन येणारे नागरीक यांची दिशा दर्शक फलक नसल्याने गैरसोय होत आहे तरी प्र. क्र.89 मध्ये दिशादर्शक फलक बसविणे.

**87 ते 88. सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**

**(87)** प्र. क्र.45, मधील "चिकणेश्वर उद्यान" से. 3 येथे उद्यानात "खुली व्यायामशाळा" (open Gym) तयार करणे. **(88)** प्र. क्र.45, मधील से. 3 राजधानी समोरील मुख्य रस्ता ते कोपरखैरणे बस डेपो मुख्य रस्त्यावरील पदपथ तयार करणे. **(89)** प्र. क्र. 45, मधील से. 3, 6, 7 मधील सर्व मुख्य रस्त्यावरील पदपथ तयार करुन त्यावर संरक्षक "लोखंडी ग्रील" (Relling) बसविणे.

**90. ॲड. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-**

प्र. क्र.44 मधील सेक्टर 7 व 15 येथील गटाराची दुरावस्था झालेली असुन ते अनेक ठिकाणी तुटलेले आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सेक्टर 7 व 15 येथील मुख्य रस्त्यावरील हेवी डयुटी गटर बांधण्याची व्यवस्था त्वरीत करणे.

**91. श्री. रामचंद्र बारशा घरत, यांजकडून :-**

प्र. क्र.66, महापालिका शाळा क्र. 20, 21 व माध्यमिक शाळा क्र. 107 येथील शाळेच्या जागेत खेळण्यासाठी घसरगुंडी, झोपाळे इत्यादी फायबर खेळणी बसविण्यात यावी व स्टेज बांधणे.

**92. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गरजु व गरीब नागरिकांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण योजना व रिक्षा चालविणे प्रशिक्षण व वाहन परवाना (महिलांकरीता) सन 2016-2017 या आर्थिक वर्षात सुरु करणे.

**93 ते 95. सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**

**(93)** प्र. क्र.85, कुकशेत येथे उर्वरित ठिकाणी दिशादर्शक फलक बसविणे. **94)** प्र. क्र.85, सारसोळे सेक्टर-6. परिसरात बांधण्यात आलेल्या काही गटारांवर पेव्हरब्लॉक लावणे बाकी आहे. सदर ठिकाणी लवकरात लवकर पेव्हरब्लॉक लावून अर्धवट असलेले काम पूर्ण करणे. **(95)** प्र. क्र.85, सारसोळे व सेक्टर-6. परिसरात रस्त्याच्या वळणावर काही ठिकाणांवर जाळीची झाकणे बसविल्याने रहदारीतील अडथळा दूर झालेला आहे. तशाच प्रकारची हेव्ही डयुटी जाळीची झाकणे प्रभागात इतर ठिकाणी लावणे.

**96 ते 98. सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**

**(96)** प्र. क्र.86, सेक्टर-6 नेरुळ येथील समाजमंदिर कमी क्षमतेचे असल्याने सारसोळे सेक्टर-6 येथील नागरिकांची गरज पाहता सदर ठिकाणी मोठी वास्तु प्राधिकरण म्हणून "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला नियुक्त प्रस्तावित" असल्याबाबत दि. 20/10/2015 रोजी आपल्या अधिकारात जी दि. 31/10/2015 रोजीची पेपर नोटीस प्रसिध्द केली आहे, त्या नोटीसीला नवी मुंबई

| | |
|---|---|
| बांधून नागरिकांची होणारी गैरसोय दुर करणे. **(97)** प्र. क्र.86, सारसोळे सेक्टर-6. परिसरातील शौचालयाची दुरावस्था पाहता शौचालय नुतनीकरण करणे. **(98)** प्र. क्र.86, सारसोळे सेक्टर-6. परिसरातील नामफलकांची झालेली दुरावस्था सुधारणे.<br>**99 व 100. श्री. घन:श्याम मढवी, यांजकडून :-**<br>**(99)** सिडको महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत 541 भुखंड विविध सामाजिक सुविधांसाठी राखीव ठेवलेले आहेत. सदर भुखंड लवकरात लवकर नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे. **(100)** शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाने दि. 25/08/2015 रोजी ज्या आय.टी. धोरणानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संपादीत जमिनीवर "एकात्मिक आय. टी. टाऊनशिप" उभारणी करण्याची जी धोरणात्मक तरतूद केली आहे आणि त्यासाठी नियोजन | महानगरपालिकेकडून हरकत घेणे.<br>**101. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**<br>प्र. क्र.23, ऐरोली, सेक्टर 10 हा खाडी किनारीचा भाग आहे. 21 जानेवारी 2016 रोजी चड्डी-बनियान टोळीने या भागात दरोडा घालून खाडी किनारी असणाऱ्या खारफुटी मध्ये लपण्यासाठी पळ काढला अशी शंका आहे. या दरोडयामुळे येथील रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी से. 10 मध्ये प्रवेश करणाऱ्या डी.ए.व्ही. पब्लिक स्कूल, गणपती मंदिर व प्रतिक सोसायटी येथील प्रमुख मार्गांना प्रवेशद्वार बांधणे. |

**मा. महापौरांच्या □ देशावरून,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 12 फेब्रुवारी 2016.**